| | |
|---|---|
| CNR-MHCH130011402022 | दाखल दिनांक – ०४/१०/२०२२<br>नोंदणी दिनांक – ०४/१०/२०२२<br>निकाल दिनांक – ०८/०१/२०२६<br>कालावधी – वर्षे महिने दिवस<br>**०३ ०३ ०४** |

| | |
|---|---|
| | **राजुरा येथील न्यायदंडाधिकारी वर्ग–१, न्यायालय क्र.२ यांचे न्यायालयात**<br>**(पीठासीन अधिकारी – निखील ल. हेमणे)**<br>**–: न्यायनिर्णय :–**<br>(घोषित दिनांक ०८/०१/२०२६)<br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५२५/२०२२,**<br>**निशाणी क्र.१७**<br>**गु.र.नं.२६७/२०२२ पोलिस ठाणे राजुरा** |
| **फिर्यादी** | सरकार तर्फे<br>पोलीस स्टेशन, राजुरा,<br>जि. चंद्रपूर |
| **अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता** | श्रीमती पी. व्ही. मेश्राम |
| **आरोपी** | **उमेश पत्रु भेंडारे,**<br>वय –२९ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>राहणार – सोनुर्ली, ता. राजुरा<br>ता. जिल्हा – चंद्रपूर. |

| | |
|---|---|
| **आरोपीतर्फे विधिज्ञ** | श्री. आर. एस. टिपले |

**भाग –ब**

| | |
|---|---|
| घटनेचा दिनांक | १९/०६/२०२२ |
| पहिली खबर दिनांक | १९/०६/२०२२ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | ०४/१०/२०२२ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २३/११/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २४/११/२०२५ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | -- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०८/०१/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

**आरोपीचा तपशीला**

| **आरोपीची श्रेणी** | **आरोपीचे नाव** | **अटक न करण्या बाबतचे पत्र** | **जामीनवर सोडल्याची तारीख** | **अधिनियम** | **निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली** | **दिलेली शिक्षा** | **सुनावणीदरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी.आर.पी.सी.** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | उमेश पत्रु भेंडारे | ०१/०७/२०२२ | ०३/०१/२०२३ | भा.दं.वि.चे कलम | निर्दोष मुक्त केले | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २७९, ३३७ सह कलम मोटार वाहन कायद्याचे कलम १८४, १३४(ब) | | | |

**भाग –क**

**अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी / बचाव / न्यायालयाचे साक्षीदार**

**अ. अभियोग**

| **श्रेणी** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | शामराव मोंडी दुर्गे | फिर्यादी |

**ब. बचाव साक्षीदार, इतर**

| **श्रेणी** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार, इतर**

| **श्रेणी** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**अभियोगपक्षाचे / बचाव / कोर्ट निशाणी**

**अ. अभियोग**

| **अनु. क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ब. बचाव**

| **अनु. क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी**

| **अनु. क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल**

| **अनु. क्र.** | **मुद्देमाल क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| १. | -- | -- |

**-: न्यायनिर्णय :-**

(घोषित दिनांक ०८/०१/२०२६)

आरोपी भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७ सह कलम मोटार वाहन कायद्याचे कलम १८४, १३४(ब) अन्वये गुन्ह्याची संपरिक्षेचा सामना करीत आहे.

**<u>अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे -</u>**

०२) शामराव मोंडी दुर्गे (न्यायनिर्णयाकामी ईथुन पुढे त्यांना फिर्यादी म्हणुन संबोधले जाईल), राहणार झेंडागुडा, ता. राजुरा यांनी तक्रार दाखल केली की, दि. १९/०६/२०२२ रोजी सकाळी ६.१५ वा. आसीफाबाद ते राजुरा बस प्रवासी भरुन निघाले असता अंदाजे ७.३० वा. दरम्यान राजुरा रेल्वे गेट बंद असल्याने फिर्यादी गाडी साईडला लावुन गेट उघडण्याची वाट पाहत असतांना त्यांना बाथरुम लागल्याने ते बाथरुमला जाऊन परत येऊन गाडी जवळ उभे असतांना वरुर कडुन राजुरा कडे येणारी मो. सा. स्पेलंडर काळ्या रंगाची गाडी क्र एम.एच ३४–बी.पी.७९१७ या वाहनाने जोरात धडक दिल्याने ते खाली पडुन त्यांच्या डोक्याला हाताला व चेहऱ्याला मार लागुन रक्त निघाले होते. त्यानंतर गाडी चालक त्याच्या गाडीसह तेथुन पळुन गेला. गाडी चालकाने लापरवाही व निष्काळजीपणे वाहन चालवुन धडक मारुन जखमी केल्याने, फिर्यादीने पोलीस स्टेशन राजुरा येथे आरोपीविरूद्ध तक्रार दाखल केली.

०३) आरोपीविरुध्द गु.र.नं. २६७/२०२२, भा.दं.सं. कलम २७९, ३३७ सह कलम मोटार वाहन कायद्याचे कलम १३४(ब), १८४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास श्री. जनार्धन पांडुरंग गावतुरे यांच्याकडे सोपविण्यात आला. त्यांनी तपासादरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा आल्याने त्याच्याविरुध्द भा.दं.सं. कलम २७९, ३३७ सह कलम मोटार वाहन कायद्याचे कलम १३४(ब), १८४ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

०४) दि. २३/११/२०२३ रोजी नि.क्र. १ वर आदेश पारीत करुन प्रस्तुत प्रकरण हे वॉरंट खटल्यानुसार चालविण्यात आले. आरोपीविरुध्द दोषारोप (नि.क्र.१०) निश्चित केले. आरोपीवर उपरोक्त कलमांतर्गत शिक्षापात्र गुन्ह्याकरीता दोषारोप ठेवला आहे. दोषारोपातील मजकुर आरोपीस त्यांच्या मातृभाषेत वाचून दाखविला असता, आरोपीने नि.क्र.११ प्रमाणे गुन्हा नाकबुल करुन संपरिक्षा चालविण्याची मागणी केली.

०५) अभिलेखावर आरोपीविरूद्ध सबळ पुरावा मिळुन आल्याने त्यांचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१(१)(ब) अन्वये निवेदन वगळण्यात आले.

०६) खटला निर्णित करणेसाठी माझ्यासमोर खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील माझे निष्कर्ष व त्या निष्कर्षामागील कारणे खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिद्ध करतो काय की, आरोपीने दि. १९/०६/२०२२ रोजी सायंकाळी ०७.३० वाजेच्या सुमारास रेल्वे गेट राजुरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर येथे त्याच्या ताब्यातील मोटार सायकल नोंदणी क्र. एम.एच.३४/बी.पी.७९१९ हा मानवी जीवन धोक्यात येईल इतक्या निष्काळजीपणाने अथवा बेदरकारपणे चालविला? | **नाही** |
| २. | अभियोग पक्षाने सिद्ध केले काय की, वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन निष्काळजीपणाने अथवा बेदरकारपणे चालवुन फिर्यादी नामे शामराव मनोजी दुर्गे यांना धडक देऊन त्यांना गंभीर दुखापत पोहोचविली? | **नाही** |
| ३. | अभियोग पक्षाने सिद्ध केले काय की, वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला वैद्यकीय मदत व त्यांच्या जवळच्यांना किंवा रुग्णालयात संपर्क न करता निघुन गेलेत? | **नाही** |

| | | |
|---|---|---|
| ४. | अभियोग पक्षाने वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन जनतेला धोकादायक ठरेल अशा वेगाने/रीतीने चालविले? | **नाही** |
| ५. | आदेश काय? | आरोपीस निर्दोष सोडण्यात येते |

**:– का र ण मि मां सा –:**

०७) आरोपीविरुध्द निश्चित केलेले दोषारोप शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षाने एक साक्षिदार तपासले आहे. फिर्यादी अ.सा.क्र.१ शामराव मोंडी दुर्गे यांना नि.क्र.१६ वर तपासण्यात आले. आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये तडजोड झालेली असुन त्याबाबत त्यांनी तडजोडीबाबत पुरसीस (नि.क्र.१६) दाखल केलेली आहे. फिर्यादीतर्फे प्रस्तुत प्रकरणात आपआपसात समझोता झाल्याचे मान्य केल्याने नि.क्र.१ वर आदेश पारीत करून सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**मुद्दा क्र.१ ते ४ करीता –**

०८) शामराव मोंडी दुर्गे (अ.सा.क्र.१) यांना फिर्यादी या नात्याने तपासण्यात आले असुन, पुराव्यात त्यांनी कथन केले ते आरोपीस ओळखत नाहीत. घटना ही अंदाजे तीन वर्षापुर्वी राजुरा रेल्वे फाटकाजवळ सकाळी ७.३० ते ७.४५ वाजताच्या दरम्यान घडली होती. पुढे त्यांनी कथन केले की, ते घटनेच्या वेळी गाडी बाजुला लावुन लघवी करण्याकरीता उतरले होते. त्यानंतर त्यांना एका वाहनाने धडक दिली होती. पुढे साक्षीदार असे कथन करतात की, घटनास्थळावर उपस्थितांनी त्यांना राजुरा रुग्नालयात उपचारा करीता घेऊन गेले व त्यानंतर ते पोलीस स्टेशन येथे गेले व आरोपी विरुध्द फिर्याद दाखल केली. त्यांनी तोंडी तक्रार व छापील प्रथम खबरी अहवाल मधील मजकुर त्यांना माहित नसल्याचे कथन केलेले आहे. तसेच सरकारी

अधिवक्त्यांनी त्यांना उत्तरसूचक प्रश्न विचारले असता, त्यांनी तक्रार दाखल करतेवेळी पोलीसांना त्यांचे तोंडी तक्रारीमधील अधोरेखांकित भाग–अ सांगितला असल्याचे स्पष्टपणे नाकारले. त्याचप्रमाणे आरोपी व त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर समझोता झालेला असल्याची बाब मान्य केलेली आहे.

०९) फिर्यादीच्या साक्षपुराव्याचे व पुरसीस नि.क्र.१५ चे अवलोकन केले असता फिर्यादी व आरोपीमध्ये आपसी तडजोड झाल्याचे दिसुन येते. अशा परिस्थितीत ईतर साक्षीदारांचे पुरावे नोंदवुनही अभियोग पक्षास काहीएक उपयोगाचे होणार नाही. सबब, नि.क्र.१ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीविरुद्ध ठेवण्यात आलेले दोषारोप जरी तडजोड पात्र नसले तरीही भविष्यात त्यांच्यातील संबंध चांगले राहावे याकरीता त्यांच्यात झालेला समझोता निश्चितच विचारात घेता येईल. फिर्यादीने दिलेली तोंडी तक्रार न्यायालयात अभियोग पक्ष सिद्ध करु शकले नाही. तसेच अभियोग पक्षाने आरोपीविरुद्ध निश्चीत केलेले दोषारोप शाबित करण्यासाठी सबळ, पुरेसा व विश्वासार्ह पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. खटल्यातील मुख्य साक्षीदाराने (फिर्यादी) अभियोग पक्षास सहकार्य केलेले नसुन सदरचा पुरावा आरोपी विरूद्धचा गुन्हा सिद्ध करण्याकरीता पुरेसा नाही व भारतीय दंड संहितेचे कलम २७९, ३३७ सह कलम मोटार वाहन कायद्याचे कलम १३४(ब), १८४ चे मुलभुत घटक देखील सिद्ध होत नाही. यावरुन अभियोग पक्ष आरोपी विरुद्ध भारतीय दंड संहितेचे कलम २७९, ३३७ सह कलम मोटार वाहन कायद्याचे कलम १३४(ब), १८४ अंतर्गत गुन्हा सिद्ध करण्यास असमर्थ ठरला आहे असे निष्पन्न होते. सबब, मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते.

**<u>मुद्दा क्र. ५ करीता –</u>**

१०) माझे वरील विवेचनावरुन अभियोग पक्ष आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेचे कलम २७९, ३३७ सह कलम मोटार वाहन कायद्याचे कलम १३४(ब), १८४ अन्वये निश्चीत केलेले दोषारोप सर्व संशयाच्या पलीकडे जाऊन शाबित करण्यास

अपयशी ठरला आहे. करीता आरोपीस निर्दोष मुक्त करणे योग्य व न्यायोचीत होईल. सबब, मुद्दा क्र.५ चे उत्तरार्थ खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी **उमेश पत्रु भेंडारे** यांना भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७ सह कलम मोटार वाहन कायद्याचे कलम १३४(ब), १८४ अन्वयेच्या शिक्षेस पात्र अपराधातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७१(१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जात मुचलके व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने रक्कम रु.२५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र देऊन भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ अन्वये पुर्तता करावी.

**(न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

स्वा/–
**(निखील ल. हेमणे)**
न्यायदंडाधिकारी वर्ग–१,
(कोर्ट क्र. २), राजुरा

स्थळ – राजुरा
दिनांक – ०८/०१/२०२६